THANE CITY
Safe Thane Secure Thane

❖ प्रेस नोट ❖

# नारपोली पोलीस ठाणे,भिवंडी
# ठाणे शहर

दिनांक ०१/०२/२०२५

## कर्नाटक, गुजरात, दमण तसेच ठाणे, मुंबई मध्ये जबरी चोरीचे गुन्हयामध्ये पाहिजे असलेला अट्टल चैन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीस नारपोली पोलीसांनी केली अटक

————————————————००————————————————

दिनांक २८/०१/२०२५ रोजी सपोनि विजय मोरे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, नारपोली पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील संशयीत आरोपीत तसेच 'कर्नाटक, दमण, गुजरात या राज्यातील पाहिजे असलेला आरोपीत नामे. **हुसैनी फैयाज सैयद राह.आबु तालीब मशिदजवळ, इंदिरानगर, आंबिवली, ता.कल्याण, जि.ठाणे.** हा कोनगाव येथे येणार आहे.' अशी खात्रीशीर बातमी प्राप्त झाली. त्यानंतर त्यास तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांचे मदतीने ताब्यात घेतले. सदर पाहिजे आरोपीबाबत माहिती घेतली असता त्याने सांताक्रुज, गोरेगाव, ताडदेव, माहिम, काळाचौकी, वनराई, सिल्वासा वापी गुजरात, शहापुर, दिंडोशी, कर्नाटक या पोलीस ठाण्याचे हददीत गुन्हे केले असुन सदर पोलीस ठाण्यात तो पाहिजे आरोपीत आहे. त्याचेकडे नारपोली पोलीस ठाणे गुन्हा रजि न. १) १७४५/२०२४ भा.न्या.स.कलम ३०९(२) अन्वये गुन्हयातील चैन स्नॅचिंग केलेले ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पॅन्डल व मंगळसुत्राचा छोटा तुकडा, २) नारपोली पो.स्टे गुन्हा रजि न.१०३/२०२५ भा.न्या.स.क.३०३(२) प्रमाणे गुन्हयातील होन्डा कंपनीची मोटार सायकल न.एम.एच.०४.के.क्यु.०५११ तसेच ३) नारपोली पो.स्टे गुन्हा रजि न.६२/२०२५ भा.न्या.स.क. ३०३(२) प्रमाणे गुन्हयातील मोटार सायकल न.एम.एच.०४.एच.एल.५८२३ असे गुन्हे उघडकीस आणुन सदर गुन्हयातील मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

तरी सदर पाहिजे आरोपीत हा कोणाला पाहिजे असल्यास नारपोली पोलीस ठाण्यास संपर्क साधावा.

**सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त परि—२, भिवंडी, श्री. डॉ.मोहन दहिकर सो, सहा.पोलीस आयुक्त, श्री. सचिन सांगळे सो व मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भरत कामत सो, पोलीस निरीक्षक(गुन्हे) ज्ञानेश्वर कामत यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक/विजय मोरे, पोउपनिरी/आकाश पवार, पोउपनिरी/डी.डी.पाटील, पोउपनिरी/भरत नवले, पोहवा/६१३५ अनिल पाटील, पोहवा/३४७३ संतोष सस्कर, पोहवा/६६३० मनोज बारेला, पोना/१७०९ अब्दुल तडवी, पोना/४३३९ संदिप जाधव, पोशि/७०९१ जर्नादन बंडगर, पोशि/८४०६ अशोक लोंढे यांनी केलेली आहे.**

————————————०००००००००००————————————

